
# बाबुराव बागूल

## वेदाआधी तू होतास



MR
891.46182
B 147 V

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

इन्दराज
Entered

# वेदाआधी तू होतास

Veda aadhi Tu Hotas

## बाबुराव बागूल

Baburao Bagul.

# वेदाआधी तू होतास

Veda aadhi Tu Hotas
BABURAO BAGUL
(POETRY)

कवी : बाबुराव बागूल

© : आयुष्यमंती शांताबाई बा. बागूल
विहितगांव, नाशिकरोड, नाशिक-४२२१०१

प्रथमावृत्ती : (धम्मचक्र परिवर्तन दिन) ऑक्टो. २००४

प्रकाशक : विनय बागूल Vinya Bagul

प्रकाशन : दिशा प्रकाशन Disha Prakashan
विहितगांव, नाशिकरोड
नाशिक-४२२१०१ Nashik

टाईपसेटींग व प्रिंटींग : वानखेडे एंटरप्राईजेस
संपन्न अपार्टमेंट, मोदकेश्वर रोड,
इंदिरानगर, नाशिक-९
मोबाईल : ९४२२२६३८१४

MR
891.46182
B147V

Library IIAS, Shimla
00124279

124279
31-3-08

मुखपृष्ठ संकल्पना :
श्री. मनोज टोचे (एस.'
श्री. काशिनाथ वेलदो

मूल्य : ९०/-
Rs. 90/-

माझ्या पडझडीच्या जीवनात आयुष्यभर
सतत मला आधार देणारी
माझी सहचारीणी
आयुष्यमती शांताबाई बा. बागूल हीस...

Library IIAS, Shimla
MR 891.461 82 B 147 V
00124279

# माझ्या या काव्यसंग्रहाच्या निमित्ताने...

वेदाआधी तू होतास ही कविता माणसाला उद्देशून आहे.

इतिहास पाहिला तर आर्य आक्रमकांच्या आधी भारतामध्ये चांगली विकसित अशी मोहेंजोदडो संस्कृती होती. हे मोहेंजोदडोची वर्णने वाचून वाटले. आर्य आक्रमकांनी भारतात आल्यावर त्यांच्या सोयीची वाटेल, अशी धर्म आणि संस्कृती विकसित केली ती वैदिक संस्कृती होय. तिलाच आज हिंदू संस्कृती म्हणतात. या हिंदू संस्कृतीमध्ये पुरुषसुक्ता-मध्ये चार वर्ण कल्पिलेले आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र. शूद्र म्हणजे इथले मूळ निवासी. इथले कष्टकरी. इथले श्रमातून संपत्ती, सुख निर्माण करणारे जनविभाग. या श्रमातून संपत्ती, सुख निर्माण करणाऱ्याला जनविभागाला म्हणजे भारतातल्या मूळ निवासीला शूद्र असे म्हटले गेले. शूद्र म्हणजे शारीरिकदृष्ट्या कनिष्ट नव्हे, बौद्धीकदृष्ट्या कनिष्ट नव्हे, मानसिकदृष्ट्या कनिष्ट नव्हे, तर फक्त युध्द हरलेला म्हणून तो शूद्र. युध्द जिंकलेले आर्य हे रानमाणसं होती. त्यांना दगड विटांची घरे बांधण्याची अक्कल नव्हती. तसेच गावे आणि शहरे वसविण्याची अक्कल नव्हती. तसेच शेती फुलविण्याचीही अक्कल नव्हती, पाण्याचा वापर करण्याचीही अक्कल नव्हती. ती फक्त रानमाणसे होती. त्यांचे अनुकरणीय जीवन म्हणजे पशू प्राण्यांचे जीवन. वाघ, सिंह, हत्ती आणि बैल हे कधी भाऊ भाऊ होत नाहीत. म्हणून तेच अरण्य आदर्श मानवी समाजजीवनात आणले आणि त्यातून मनुस्मृती निर्माण झाली. पुरुषसुक्त निर्माण झाले. आणि विषमतेचा, भेदभावाचा पुरस्कार करणारे नीतिशास्त्र, कार्यशास्त्र, कायदेशास्त्र जन्माला आले.

जैनधर्म, बौद्धधर्म हे वैदिक धर्माच्या जवळपासचे भारतातील समकालीन धर्म. जैन धर्माने, बौद्ध धर्माने मनुस्मृतीचा स्वीकार केलेला नाही. पुरुषसुक्ताचा स्वीकार केलेला नाही आणि विषमतेचा अन् भेदभावाचा स्वीकार केलेला नाही.

असे का घडावे ? एकाच भूमीवर जन्मलेले हे तिन्ही धर्म. फक्त वैदिक धर्म भेदभाव अन् उच्च निच्चतेचा पुरस्कार करतो. सर्वांगीण विषमतेचा पुरस्कार करतो आणि जैन धर्म व बौद्ध धर्म या सर्व गोष्टींचा नकार करतो. आशिया खंडातील दुसरे दोन धर्म ख्रिश्चन आणि मुस्लीम धर्म हे मनुस्मृतीचा पुरस्कार करत नाही किंवा विषमतेच्या कोणत्याही बाबीचा पुरस्कार करत नाही. आर्थिक विषमता जगभर मानवी समाजात होती. भारतातील वैदिक धर्माने निर्माण केलेली भयाण अन् भीषण विषमता आशियामधल्या ख्रिश्चन अन् मुस्लीम धर्माने स्वीकारली नाही.

असे का घडावे ? वैदिक धर्माला विषमतेची इतकी का आवश्यकता वाटावी ? भारतातील जैन आणि बौद्ध धर्माने समतेचा आणि बंधुभावाचा खुलेआम स्वीकार केलेला आहे. तसेच ख्रिश्चन अन् मुस्लीम धर्माने समतेचा आणि बंधुभावाचा खुलेआम स्वीकार केलेला आहे. भारतातील दोन धर्म जैन आणि बौद्ध अन् जगातील दोन धर्म ख्रिश्चन अन्

मुस्लीम धर्म हे खुलेआम समतेचा अन् बंधुभावाचा स्वीकार करतात. फक्त वैदिक धर्म वेदामध्ये पुरुषसुक्त मान्य करतो आणि विषमतेचा अन् चार वर्णाचा पुरस्कार करतो. म्हणून वेद हे माणसाने निर्माण केलेले नाहीत. स्वयंभू, अपौरुषेय निर्माण झालेले आहेत, असा प्रचार करतो. या विषमतेचा पुरस्कार करण्यासाठी वैदिक धर्माने अनेक भानगडी निर्माण करुन ठेवलेल्या आहेत. त्याचे एक उदाहरण म्हणजे गतजन्मावर पापपुण्याचा स्वीकार.

मी फुले-आंबेडकरी विचारांचा असल्यामुळे डार्विन, हेगेल आणि मार्क्स यांची विचारसरणी मला मान्य असल्यामुळे, मी माणसाचा, माणसाच्या महत्तेचा जोरदार पुरस्कार करतो; म्हणून मी माणसाला उद्देशून म्हणतो-

हे माणसा,
वेदाआधी तू होतास
अन् वेदांच्या परमेश्वराआधी तू होतास
हे माणसा,
तू सूर्याला सूर्य म्हटले
आणि सूर्य सूर्य झाला
तू चंद्राला चंद्र म्हटले
आणि चंद्र चंद्र झाला
अवघ्या विश्वाचे नामकरण तू केलेस
हे माणसा,
तुच आहे सर्व काही
तुझ्या मुळेच सजीव सुंदर झाली
ही मही...

सर्वांगीण विषमतेचा पुरस्कार वैदिक संस्कृतीने केला त्याचा परिणाम म्हणून प्रत्येक आक्रमणापुढे पराभूत होणारा, गुलाम होणारा समाज भारतात निर्माण झाला.

सिद्धार्थ गौतम बुद्धाचा भारत हा ज्ञानाच्या विज्ञानाच्या, तंत्रज्ञाच्या यंत्रज्ञानाच्या आघाडीवर असायला हवा होता. एवढेच नव्हे तर मानवी जीवन सुखी समृद्धी, दु:ख दैन्य-विरहीत, विषमताविरहीत संघर्षातही आघाडीला हवा होता. कारण सिद्धार्थ गौतम बुद्धाने मानवी मनाचा, मानवी शरीराचा आणि मानवी समाजाचा खूप सखोल विचार तीन हजार वर्षापूर्वी मांडलेला होता. बौद्ध विचारधारेचा आणि ज्ञान-विज्ञानाचा विकास होत गेला असता, तर भारत गुलामाचे राष्ट्र राहिले नसते. परंतु भारताचा अनेक शतकांचा इतिहास हा पराभवाचा अन् गुलामगिरीचा इतिहास आहे. याला कारण वैदीक धर्माने केलेला विषमतेचा प्रचार आणि प्रसार.

विषमतेची आणि भेदभावाची येथे जर स्थापना झाली नसती तर प्रत्येक परकीय

आक्रमणांचा प्रतिकार ऐक्यभावाने केला गेला असता आणि भारत स्वतंत्र देश राहिला असता. भारताच्या गुलामगिरीला, दास्याला, दैन्याला, दु:खाला कारण वैदिकांनी निर्माण केलेली सर्वांगीण विषमता आहे. या विषमतेमुळे बंधुभाव, ऐक्यभाव भारतात कधीच निर्माण झाला नाही. त्यामुळे परकीय आक्रमणांचा प्रबळ प्रतिकार झाला नाही. देशात घातक संस्कृती जी निर्माण झाली ती आर्य आक्रमकांनी निर्माण केलेल्या धर्म संस्कृतिच्या परिणामातून झाली आहे.

या विकृत वास्तवाचे पहिले ज्ञान महात्मा फुले यांना झाले आणि त्यांनी वर्णवर्चस्ववादाच्या विरोधात, हिंदुधर्माच्या विरोधात, ब्राह्मणवादाच्या विरोधात पहिला प्रखर हल्ला केला आणि भारतीय मूळ निवासी जनविभागाला म्हणजे शूद्र-अतिशूद्रांना, बहिष्कृतांना संघटित करण्याचा प्रयत्न केला आणि विचार दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म. फुलेंना गुरु मानले. त्याचे मूळ कारण म. फुलेंना झालेल्या इथल्या समाज वास्तव्याचे ज्ञान होय. म्हणून डॉ. बाबासाहेबांनी नवा समाज, नवी संस्कृती निर्माण करण्यासाठी आणि भारत हा स्वतंत्र आणि समृद्ध देश करण्यासाठी लोकशाहीचा, सामाजिक लोकशाहीचा, आर्थिक-लोकशाहीचा पुरस्कार केला आणि त्या तऱ्हेचे संविधान निर्माण केले. जाती उच्चाटन व्हावे, सामाजिक विषमतेचे उच्चाटन व्हावे, स्त्री-पुरुषामधल्या विषमतेचे उच्चाटन व्हावे म्हणून हिंदूकोड बिल तयार केले. हे डॉ. बाबासाहेव आंबेडकर भारताचे खरे भाग्यविधाते होय. जर डॉ. आंबेडकर वर्ण समाजातले असते अन् जाती समाजातले नसते तर भारतीय जनतेने त्यांना अतिशूद्रांचे पुढारी मानले नसते; तर भारताचे भाग्यविधातेच मानले असते. तर बाबासाहेब हे अमेरिकेचे अब्राहम लिंकन, जॉर्ज वॉशिंग्टन आणि रशियाचे लेनिन किंवा चीनचे माओत्से तुंग यांच्या प्रमाणे राष्ट्रपिताच मानले गेले असते. परंतु जाती समाज असल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर एका जातीचेच पुढारी मानले गेले. वीस कोटी अस्पृश्यांचे हे मुक्तीदाता पुढारी मानले गेले नाहीत. हा दोष येथील जातीव्यवस्थेचा व वैदिक हिंदू धर्माचाच आहे. डॉ. बाबासाहेबांची कोंडी करणारी आणि अवमूल्यन करणारी हिंदूधर्म संस्कृती आहे. आणि तिच्यातील जातीव्यवस्था आहे. जातीव्यवस्थेने अनेक क्रांत्या मारुन टाकल्या आणि जन्मू दिल्या नाही ही भीषण भयंकर घातक जातीव्यवस्था आणि तिचा पालन पोषन करणारा हिंदू धर्म नष्ट व्हावा म्हणून बाबासाहेबांनी लोकशाहीचे पुरस्कार करणारे संविधान आणले आणि ते ही अपूरे पडले म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध धर्माचा स्वीकार, प्रचार, प्रसार केला.

या भारत भाग्यविधाता डॉ. आंबेडकरांना आणि म. फुलेंना मानणाऱ्या या लेखक कवींनी कसे साहित्य निर्माण करावे ? ज्याचा विध्वंस म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सतत केला तशी साहित्यनिर्मिती करणे आवश्यक आहे. म्हणून नवे भारतीय साहित्य हे

कटाक्षाने वर्ण वर्चस्ववादाच्या विरोधी, जातीभेदा, विषमताविरोधी असेल. हे साहित्य स्त्रियांचे कधीच अवमूल्यन करणार नाही. तिला भोग्य वस्तू मानणार नाही. कष्ट करणाऱ्या व्यक्तीला आणि समाजाला कनिष्ट ठरवणार नाही. आणि शास्त्रपुराणांनी ज्येष्ट आणि कनिष्ट मानले. त्यांना स्त्री, शूद्र, अतिशूद्र, बहिष्कृत मानणार नाही. त्यांना कनिष्ट ठरवणार नाही, तर त्यांना महानायक करणार. त्यांच्या दोषांचेही, अवगुणांचेही विश्लेषण करणार. त्यांचे दोष अवगुण हे त्यांचे नसून ते वावरत असलेल्या धर्मसंस्कृतीने दिलेले आहेत, हे मांडण्याचा आटोकाट प्रयत्न करणार. असे प्रयत्न मी लिहिलेल्या कथा कादंबऱ्यांतून, कवितेतून केलेले आहे असे आपल्याला दिसेल...

मी आता पंचाहतराव्या वर्षात पदार्पण केले आहे. मला लहानपणापासून लिहिण्या-वाचण्याची आवड निर्माण झाली. मी पुष्कळ लिहिले. परंतु पुष्कळ प्रकाशित केले नाही. माझे मित्र, माझे नातेवाईक आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना माझा हा स्वभाव आणि माझे हे दोष माहीत होते. त्या सर्वांनी माझे अप्रकाशित राहिलेले साहित्य प्रकाशित करण्याचा संकल्प केला. त्यातून मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे हे साहित्यिक, रसिक व सामाजिक जाणीवेचे असल्यामुळे त्यांनी अर्थसहाय्याची तजवीज करुन, नाशिकरोडच्या आंबेडकर पुतळ्याच्या उद्‌घाटनप्रसंगी दोन लाख रुपये जाहीर केले. तसेच माझ्या मित्रांनी आतोनात कष्ट घेतले. त्यात प्रामुख्याने खासदार रा.सू. गवई, खासदार रामदास आठवले, काशिनाथ वेलदोडे, शिवा इंगोले, महेंद्र भवरे, सावते, राजीव नाईक, रविंद्र मालुंजकर आणि माझी मुलं प्रा. शोभा बागूल, मिलिंद बागूल, विनय बागूल, तसेच जावई ॲडव्होकेट नाना अहिरे इत्यादि.

- बाबुराव बागूल

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| वेदाआधी तू होतास | ९ |
| भगवान बुद्ध आणि अंगुलीमाल | १० |
| सूर्याचा सांगाती | १३ |
| तुम्ही असे आहात की ! | १५ |
| तुमचे हात | १६ |
| 'हे माणसा' | १७ |
| माणूस | १८ |
| माणूस | १९ |
| प्रज्ञावंत प्रलयकारी हात | २० |
| कार्यकर्ता | २१ |
| मशाल | २२ |
| शेतकरीण | २३ |
| हे नारी | २४ |
| तुला व्हावेच लागेल दुसरे आंबेडकर | २६ |
| सम्यक सम्बोधी | २८ |
| क्रान्तीस | ३० |
| जसे होते पूर्वी तसेच आहे | ३१ |
| कृष्ण | ३२ |
| धर्म अवतरले नसते तर... | ३३ |
| अहिंदू होतो ! | ३५ |
| ज्याने केली चूक इथे जन्म घेण्याची | ३७ |
| अहिंदू | ३९ |
| महाकवी जोतिराव फुले | ४० |
| ज्योती फुले म्हणतात... | ४१ |
| स्त्री | ४२ |
| कोळीवाड्यातील कष्टकऱ्यांच्या मेळाव्यात | ४४ |
| देव, दुःख आणि माणूस | ४७ |
| दवाखाना | ४९ |
| बुद्धा नंतर | ५० |
| विठोबा | ५१ |
| प्रवचने | ५२ |
| सिद्धार्था गौतमा बुद्धा | ५३ |
| बुद्ध, फुले, आंबेडकर : भारत भाग्यविधाते | ५५ |
| डॉ. आंबेडकर | ५७ |
| हे स्वातंत्र्या, तुकोबा चोखोबाला तू दिसत नव्हतास | ५९ |
| स्वातंत्र्या-१ | ६१ |
| स्वातंत्र्या-२ | ६३ |
| स्वातंत्र्या-३ | ६४ |
| स्वातंत्र्या | ६५ |
| नसेल दास | ६६ |
| संगीत | ६७ |
| पहाट आणि मृत्यू ! | ६८ |
| अस्पृश्य | ७० |
| कारकून | ७१ |
| स्वातंत्र्या | ७२ |
| मराठाचे अग्रलेख | ७३ |
| नवा मानव हा | ७५ |
| मला प्रलय केले आहे | ८० |

# वेदाआधी तू होतास

*वेदाआधी तू होतास*
*वेदाच्या परमेश्वराआधी तू होतास,*
*पंच महाभूतांचे पाहून*
*विराट, विक्राळ रूप*
*तू व्यथित, व्याकूळ होत होतास,*
*आणि हात उभारुन तू याचना करीत होतास,*
*त्या याचना म्हणजे 'ऋचा'*
*सर्व ईश्वरांचे जन्मोत्सव,*
*तूच साजरे केलेस,*
*सर्व प्रेषितांचे बारसेही*
*तूच आनंदाने साजरे केलेस*
*हे माणसा,*
*तूच सूर्याला सूर्य म्हटलेस*
*आणि सूर्य, सूर्य झाला*
*तूच चंद्राला चंद्र म्हटलेस*
*आणि चंद्र, चंद्र झाला*
*अवघ्या विश्वाचे नामकरण*
*तू केलेस*
*अन् प्रत्येकाने मान्य केले*
*हे प्रतिभावान माणसा,*
*तूच आहेस सर्व काही*
*तुझ्यामुळेच सजीव सुंदर*
*झाली ही मही.*

• • •

# भगवान बुद्ध आणि अंगुलीमाल

*...भगवान बुद्ध म्हणाले*
*'अंगुलीमाल',*
*तुला आणायचा आहे काय*
*तो आदिम वेदाआधीचा अंधार ?*
*की, आणायचा आहे वेदकालीन*
*अबोध..आंधळा अंधार ?*
*म्हणून, तू तोडतो आहेस सृजनशील बोटे*
*आणि सृजनशील सृष्टीत आणि गतीत*
*माजवितो आहेस हाहा:कार*
*'अंगुलीमाल'..*
*हात होते तेव्हा अबोध, अबोल, आणि दुबळे*
*नव्हते, आजच्यासारखे इंद्रजीत विजेते*
*म्हणून टिकून होता निसर्गदत्त अंधार !*
*आता तर हात आहेत प्रज्ञावंत*
*आणि आहेत सूर्यासम प्रकाशमान*
*नाही आता तू आणू शकणार*
*वेदकालीन अभाव आणि हाहाकार*
*आता...हात करीत आहेत*
*लोककल्याणाचे मंगलमय चमत्कार*
*भरीत आहेत भांडारामागे भांडार*
*अन करीत आहेत सुखसमृद्धी साकार*
*आता हात आहेत एवढे बलवान*
*की त्याच्याएवढे निसर्गातही नाही कोणी श्रीमान*
*आणि नाही कोणी उदार अपार*
*हे तू ऐकून घे. शेताशेताकडून मळ्यामळ्याकडून*
*विहिरी आणि तळ्यातळ्याकडून*

अन्, ऐकून घे पशूपक्ष्यांकडून
हे उदार हात अन् त्याची निर्मितीक्षम बोटे तोडून
तू निकामी करतो आहेस
आणि आणू बघतो आहेस
तो वेदकालीन अभाव अन् आकांत !
आणखी तो वेदकालीन असीम अंधार
अरे वेड्या, वैदिकासारखा तूही
माणसाचा अपमान करु नये.
माणसासमान दुसरे महान आहे काय ?
माणसाची बोटे
करतात अनेक अद्‌भूत अविष्कार
ऐकतोयस ना तू कधी कधी
ढोल-ढोलकी, डफाचे थरार !
तंतावरील स्वरांचे लाघव
कोमल निषाद आणि गगनगामी पंचम !
ते बोल, ते सूर,
उघडतात दारे मनांची आणि दिशांचीही
ती किमयागार बोटे
तोडतोस तू
वर्णवर्चस्ववादी वैदिकांच्या वेडेपणाने
घालतोस गळ्यात हार
त्या सृजनशील बोटांचे.
अंगुलीमाल,
तू आहेस काय वैदिकांप्रमाणे अलंकारवेडा ?
ऐकून बुद्धाच्या वचना.
तो म्हणाला,
"तथागता, आता मी करु काय ?
भगवान बुद्ध म्हणाले,

"तलवारीच्या पात्याने
फळाफुलांची बाग फुलवशील काय ?
कृषीच्या सारंगीवर
तलवारीने दाखवशील काय ?
सुखसमृध्दीचे स्वर काढून
आणि दाखव या तुझ्या तलवारीने
नानारंगी वस्त्रे विणून
आणि दाखव या तुझ्या तलवारीने
सुंदर सुंदर सदने बांधून
या तुझ्या तलवारीने
दाखव वृक्षवेलींवर
फळेफुले बहरवून.
तलवार सृजनक्षम नसते
संहारक असते
लोककल्याणाचा विचार केला तर
तर ती कधी सृजनक्षम होते.
बुद्धाची ऐकून ही वचने
फेकून दिली त्याने तलवार
आणि फेकून दिले
गळ्यातले अंगुलीचे हार !
अन विचारले , नम्रपणे
"तथागता,
मी आता करु काय ?"
भगवान म्हणाले,
"चरिथ भिकवे चरिकम्
बहुजन हिताय, बहुजन सुखाय
लोकानुकंपाय चरिकम् !"

• • •

# सूर्याचा सांगाती

*हे माणसा,*
*सूर्य तुझा सांगाती*
*ग्रहगोल, तारे तुझे सखेसोबती*
*तू सागरसरीतांचा सहोदर*
*अनेक अरण्ये, जन्मलीत, मेलीत, तुझ्यासमोर*
*तूही मर्त्य, पण तुझे सृजनशील कर अजरामर*
*तसेच तुझे श्रमही अजरामर*
*म्हणून वृक्षवल्लरींचा लोभ, लय तुझ्यावर*
*मानती ते तुला सोयरा भारी*
*पशूपक्ष्यांहून प्रियतर*
*देती तुला भेटी नित्यनेमाने*
*पिकून शिवारभर जगभर !*
*हे माणसा,*
*वृक्षवल्लरींना वाटतो तू*
*सूर्यासम संवर्धक स्नेही*
*तसाच जलापरी भारी संजीवक स्नेही*
*तुझ्यापरी नाही विश्वामाजी दुसरे कोणीही*
*तुझ्याएवढी नाही कोणापाशीही*
*संवेदनशील करुणा अन् शक्ती*
*हे सांगतात ते अंतराळीच्या अग्नीबंबाळ मित्रमंडळींना*
*पटते ही पृथ्वीच्या पुत्रपुत्रींनी दिलेली ग्वाही*
*म्हणून अंतराळीची कोणतीही शक्ती*
*निसर्गनियमांचे उल्लंघन करत नाही !*
*पाठवित नाही अग्निप्रलय*
*कारण बघतात ते वरून युगायुगापासून*

तुझी काव्यात्मक, कलात्मक, सुखद, सुंदर
कर्तबगारी !
तुझे हात मुक्त झाल्यापासून
तुझे हात प्रबुद्ध अन् श्रमशूर झाल्यापासून
बघतात ते पृथ्वीची समृद्धी अन् श्रीमंती
अन् अन्यत्र कुठेच न अवतरलेली सभ्यता अन्
संस्कृती
सर्व सहोदरांपेक्षा अधिक पृथ्वीने केलेली प्रगती
केवळ तुझ्या हातामुळेच झालेली
म्हणून अंतराळीची कोणतीही शक्ती
तुझ्या प्रेमाखातर
करत नाही इर्षेचे प्रगटीकरण,
विध्वंसक जाळपोळ
एवढा तू अवघ्या विश्वाचा प्रियतर
अन् विश्वात्मकही, आत्मजही !

• • •

# तुम्ही असे आहात की !

*तुम्ही असे आहात की*
*तसे निसर्गाच्या सृष्टीत दुसरे कोणी नाही.*
*निसर्गातील महाभूते तुम्हाला भारी नाहीत*
*तुमचे कष्टाळू, प्रज्ञावंत हात*
*प्रलयकारी होवू शकतात,*
*याला निसर्ग साक्ष आहे.*
*हे त्या रानढोरांनी, वैदिकांनी ओळखले होते*
*म्हणून त्यांनी तुम्हाला शूद्र म्हटले*
*आणि अनेक बंधनांनी जखडून टाकले*
*हिंदू धर्म म्हणजे तुमची जखडणूक आहे*
*हे तुम्ही ओळखले पाहिजे,*
*तुम्ही कसे आहात? हेही तुम्ही ओळखले पाहिजे*
*निसर्गाशिवाय आणि तुमच्याशिवाय*
*दुसरे कोणीच मोठे नाही*
*हेही तुम्ही जाणले पाहिजे*
*एवढेच माझे सांगणे !*

# तुमचे हात

*तुमचे हात असतील बंदिस्त*
*पण आहेत ते सृजक !*
*तुमचे हात असतील अबोल, अबोध*
*पण आहेत ते परिवर्तनाचे रथ*
*आणि आहेत प्रगतीचे पथ*
*तुमची पाच बोटे म्हणजे पंचमहाभूते*
*या बा. बा. च्या कल्पना नाहीत*
*रशिया, अमेरिका आणि युरोप साक्ष आहे,*
*तुमच्या अलोट सामर्थ्याला.*

• • •

## ‘हे माणसा’

*हे माणसा,*
*सूर्याने जे पाहिले नाही*
*ते तू पाहिले आहे*
*अधिक म्हणजे ते तुला कळले आहे*
*सर्व शक्तींनी जे केले नाही*
*ती सर्व सुखे तू सजीव, सुंदर केलीस*
*हे माणसा,*
*तुझ्या मांडीवर खेळ खेळत*
*युगे मोठी होत गेली, कर्तबगार झाली !*
*हे माणसा,*
*नियती आणि निसर्गाशी*
*तुझा सुखसंवाद युगानुयुगे चालू आहे*
*आणि तुमच्या स्नेहातून*
*प्रीतीशृंगारातून क्रांत्यांचे जन्म होत आहेत.*

• • •

# माणूस

*सूर्य म्हणतो,*
*''तो माझा सोबती आहे.''*
*चंद्र म्हणतो,*
*''तो माझा सखा सांगाती आहे.''*
*सागर म्हणतो,*
*''तो माझा खेळगडी आहे,*
*वादळवाऱ्याशी खेळताना*
*मी त्याला अनेकदा पाहिला आहे.''*
*वणवा म्हणतो,*
*''तो माझे वीणावादन ऐकत बसतो.''*
*झंझावात म्हणतो,*
*''तो माझे नर्तन पाहत बसतो.''*
*तो रसिक, सूज्ञ, सक्षम कवी आहे.*
*तो 'माणूस' आहे.*

• • •

## माणूस

*माणसाएवढे महान काही नाही*
*माणसाएवढे सामर्थ्यवान पृथ्वीवर दुसरे नाही.*
*माणसाचे हात वणव्याला भारी होऊ शकतात*
*प्रलयाचे पायी दोरी बांधू शकतात.*
*हे वनात वावरणाऱ्या वैदिकांनी*
*द्रविडांची कामगिरी पाहून ओळखले होते.*
*म्हणून त्यांनी माणसाला मोडून ठेवण्यासाठी*
*जातीभेद केले.*
*तुम्ही जातीभेद मानणार काय ?*
*माणसाचा अवमान करणार काय ?*

• • •

# प्रज्ञावंत प्रलयकारी हात

*हे माणसा,*
*तुझे कष्टाळू हात*
*प्रज्ञावंत अन् प्रलयकारी !*
*पंचमहाभूतांपरी शक्तिशाली*
*तुझे कष्टाळू हात आहेत.*
*हे माणसा,*
*तुझे कष्टाळू हात*
*घातक अन् अघातक अपार*
*करील काळाचा प्रहार*
*तुझे कष्टाळू हात*
*हे माणसा,*
*तुझे कष्टाळू हात.*
*संपत्तीचे सागर*
*समृद्धीचे आगर*
*प्रगतीचे पथ आहेत.*

• • •

# कार्यकर्ता

*काळी काळी, निळी जांभळी*
*सभोवार पसरलेली*
*नि:शब्द रात्र असते !*
*चाललाय तो एकटाच*
*त्याच्याच कार्याच्या विचारात !*
*उद्या करायच्या कामाच्या विचारात !*
*शिणलेला खूप, तरी समाधानात !*
*अंत:करणाच्या आभाळात*
*कल्पनांच्या विजांचा चमचमाट !*
*शरीराच्या कणाकणात*
*चैतन्याचा झगमगाट !*
*काळोखातून घरी चाललाय*
*पायाखालची वाटही काळोखलेली !*
*अन् त्याच्या प्रत्येक पावलापावलात प्रकाश !*
*म्हणून भोवताल प्रकाशमान्*
*हत्यारासारखे त्याचे हात निर्भय !*
*वाटतात तेही प्रकाशमान !*
*त्याच्या शब्दाशब्दांतून पेटते पलिते !*
*पेटवितो मने तो*
*त्याच्या शब्दाशब्दांतून*
*उठवितो माणसे तो*
*काळोखाचे कैदी झालेले*
*करीतो त्यांनाही प्रकाशमान !*
*चालता चालता जर*
*झाली घरची, बायकापोरांची आठवण,*
*खुलतो, फुलतो*
*घरचे स्मरण, होते स्फुरण*
*रणात विजयी होण्याचे !*

• • •



124279

# मशाल

*ती तेवढी मशाल घे*
*उजेड देत त्या गरिबांच्या वस्त्यांकडे जा !*
*जसा येशू गेला होता तसाच जा*
*आणि तथागत बोलत होता तसाच बोलत रहा.*
*त्यांना सर्व कळते*
*शास्त्र कळते अन् दर्शनही कळते*
*काव्यही कळते आणि रसशास्त्रही कळते.*
*म्हणून ऐकण्याची, बोलण्याची*
*मनूने त्यांना मनाई केली होती.*
*पलंगप्रतापी कामवीरांनी शासक आणि शोषकांनी*
*ती तंतोतंत पाळली होती*
*म्हणून दाशरथी रामाने*
*शंबुकाची गर्दन छाटली होती*
*आणि दुष्ट द्रोणाने*
*एकलव्याची बोटे छाटली होती*
*ही कत्तल शतकानुशतके चालू होती*
*तरी त्यांची परिवर्तनशक्ती*
*कधीच संपली नव्हती.*
*त्याला सांग  ''तू बोलू लाग''*
*''तुझ्या शब्दाशब्दातून पेटते आग'' हेही सांग*
*आणि हेही सांग,*
*''तू नाहीस रथसारथी*
*म्हणून क्रांती या भारती येत नाही.*
*आता क्रांतीचे आणि जीवनाचे*
*आणि देशाचे पुढारपण तू स्वीकार.*
*येऊ  दे क्रांती या दुःखी देशात*
*दुःख फार झाले आहे*
*ते दूर होऊ दे !*
*येऊ दे क्रांती या दुःखी देशात !*

• • •

# शेतकरीण

*महन्मंगल*
*श्रमसुंदर तुझे हात*
*शिरावरली पाटी सावरून धरलीय तू.*
*चपळ चंचल चरण जणू*
*शिवाराला सांगतीस नृत्य संगीताचे बोल*
*जोडवी फूल मासोळ्यांच्या झंकाराने*
*नादमधूर होतेय पायवाट.*
*सकाळच्या सूर्यासमान*
*कपाळावर प्रसन्न कुंकू*
*अन् अधरावर चंद्रज्योती.*
*ल्यालीस लुगडे चोळी तू*
*पावलोपावली*
*ढोलकीच्या ठेक्याने व्हावी*
*तशी तालसुंदर करीत पायवाट*
*चाललीस तू तुझ्या शेताकडे.*
*जाणवते तुझी आतुरता*
*श्वासोश्वासासवे तंग चोळीच्या*
*करकरतात गाठी*
*पाठीपोटी दाटते चोळी*
*बांधावरुन बघतोय हासतोय तो आनंदाने,*
*दूर दूरुनही दिसते तुला तो.*
*बसणार आहे मिठी मोठी*
*मोठ्या प्रेमाची ! ठावे आहे तुला सारे*
*रोज घडणारे म्हणून तुझी लगबग फार*
*अन् शेतसरी लुटते लयलूट*
*तुझ्या हालचालीतील तालसुराची*
*उरातील तगमगीची !*

• • •

# हे नारी

*तुझे ललित, सुंदर नारीपण*
*मनमोहक आहे*
*नेत्रसुखद आहे.*
*तुझ्या सुरेख, सुडौल शरीरावर*
*निसर्ग आणि नियती*
*प्रगट करतात तरुणपण.*
*तेव्हा तुझे नश्वर शरीर*
*होते अजरामर अनेक*
*कलाकृतींचे प्रदर्शन*
*वा प्रदर्शनीय संग्रहालय*
*तुझ्या दर्शनानेच कलावंतांना*
*सुचतात कलाकृती आणि वास्तूशिल्पे*
*तुझ्या आशयपूर्ण उरोजांवरुन*
*देवालयाची मस्तके,*
*कळस साकार झाले आहेत*
*आणि ते स्वर्गाशी*
*सतत संवाद करतात असे मानले जाते आहे.*
*हे नारी,*
*तुझे प्रिय प्रेयसीपण तर*
*पूर्वीपासून काव्यनाटकांना अमर करते आहे*
*अन् घरोघरी, सर्वभर*
*तुझे पत्नीपण सर्व पतींना*
*स्वर्गासम वाटते आहे.*
*तसेच तुझे आईपण तर*
*परमेश्वराला भारी भरते आहे.*

श्रद्धा, भक्तिभाव तुझ्यामुळेच
घरोघरी, मनोमनी आकाराला आलेले आहे
धर्मप्रचारकांनी हे तुझे महन्मंगलपण
त्यांच्या देवासाठी लुटले आहे, लाटले आहे.
तुझे प्रेमळ आईपण पाहून
तुझी सर्व पोरावरली माया पाहून
पिता परमेश्वराची कल्पना
प्रेषितांना सुचली.
अशी तू,
सर्व महन्मंगल कल्पनांची माता तू
पहिल्या प्रेमाची मालकीण तू !
प्रियतमा तू !
स्वर्गाहून सुंदर तू !
प्रिय पत्नी तू !
संसारातील स्वर्ग तू !
वासनाविकारांचा वसंतोत्सव तू !
देव, धर्म, देवळांहून भारी तू !
नारी म्हणूनही, आई म्हणूनही !

• • •

# तुला व्हावेच लागेल दुसरे आंबेडकर

मनू मानी ज्यांना महाअरी
तिथे तुझा जन्म झाला असेल तर
तुला व्हावेच लागेल 'आंबेडकर'
युगांतरकारी 'आंबेडकर' !
क्रांतिकारी 'आंबेडकर' !
मनूचा मर्मांतिक वैरी 'आंबेडकर' !
दुसरा पर्यायच नाही.
तुला व्हावे लागेल आंबेडकर !
'आंबेडकरां' एवढा मोठा नाहीस झाला
तरी लहानसा का होईना?
आंबेडकरच व्हावे लागेल तुला
तुझ्या बापापरी मजूर नाही,
वा मास्तरही नाही,
कलेक्टरही नाही
फक्त आंबेडकर होणे आहे तुला
म्हणजे सम्यक क्रांतीला
देशात आणणे आहे तुला !
इथे या देशातील दुष्टांनी
कधी देव होऊन
कधी देवावतार होऊन
कधी धर्म होऊन
फार छळले आहे देशवासियांना !
स्त्री, शूद्र बहिष्कृतांना !
मूळ मालक असल्यामुळे,
सृजक, संवर्धक असल्यामुळे
एवढे पिडले की,
तुला संघर्षशील आंबेडकर होण्याविना,

*संगरांमागे संगर केल्याविना*
*गत्यंतर नाही तुला,*
*आंबेडकरांचे अनुकरण*
*करणे जरूर आहे तुला*
*अनेक युगानंतर*
*अनेक एकलव्य, शभुंकानंतर*
*एक आंबेडकर*
*जगू शकले फक्त*
*अन् तू त्यांच्यानंतर*
*जगलेला!*
*तुझ्या विकासाला कारण*
*तू एकटा नाहीस,*
*आणि नाही हिंदू धर्मपण*
*तुझ्या विकासाला कारण*
*'आंबेडकर'!*
*हे ध्यानात धर.*
*त्यांचे अनुकरण कर*
*अथवा दारुण देशभक्त*
*क्रूर, कठोर क्रांती कर*
*स्टॅलीन हो!*
*त्याविना हा भगवान बुद्धाचा*
*सुफळ, सुंदर, समृद्ध देश*
*'प्रबुद्ध भारत' होणार नाही.*
*राहील दंगलखोर कौरव-पांडवांचा देश*
*किंवा यादवीने पिडलेला देश.*
*म्हणून मी म्हणतो*
*तुला व्हावेच लागेल आंबेडकर*
*करुणामय, क्रांतिकारक 'आंबेडकर'!*
*भारत भाग्यविधाता 'आंबेडकर'!*

● ● ●

## सम्यकसम्बोधी

*दलितांचे कुळी*
*जन्म झाला माझा म्हणूनी मी,*
*घेतला शिरी*
*दु:खी दुनियेचा भार*
*आणि जनतेच्या*
*दर एक संगरी*
*असेल माझा पुढाकार.*
*दलितांचे कुळी*
*जन्म झाला माझा म्हणूनी मी,*
*व्यासभारताला*
*बदलुनी करीन*
*'आंबेडकर-भारत !*
*असेन मी,*
*त्या लोकसत्ताक भारताचा*
*क्रांतिकारक रचनाकार.*
*दलितांचे कुळी*
*जन्म झाला माझा म्हणुनी मी,*
*करीन अशी ग्रंथरचना*
*वाचून त्या माझ्या वचना*
*ठोकरतील लोक पोथ्यापुराणांना*
*आणि मनुस्मृतीच्या*

*करंट्या कारट्यांना*
*गीता, भारत, रामायण*
*आणि अनेक मिथकांना.*
*दलितांचे कुळी*
*जन्म झाला माझा म्हणुनी मी,*
*बोलेन जी महावाक्ये त्यायोगे*
*स्त्रियांचे स्पर्धक- 'ईश्वर'*
*उरणार नाहीत भूवर !*
*सुरु होईल पुन्हा*
*आदाम-ईव्हचा संसार.*
*नाही कोणी पत्नी*
*अन् नाही कोणी भरतार,*
*दोघेही*
*जीवनसंघर्षातले साथीदार.*

• • •

# क्रान्तीस

*अनार्किस्ट झालोच आहे आता मात्र अंत पाहू नको*
*बाई बाटलीची मला ओढ नाहीच*
*गेलो आहे तिथेच राहू दे, पुढे मात्र ढकलू नको*
*कित्येक पिढ्या तुझ्यासाठी खर्ची पडल्या*
*काल परवाही अर्धवटाचे ऐकूण तुझ्यासाठी काही लढल्या*
*पण तू आलीच नाहीस होते तसेच राहिले*
*किती तपे उलटली, दुःख मात्र वाढतच राहिले*
*खरोखरीच आता साहवत नाही, पाहवत नाही*
*दगड व्हावे कसे ? साले कोणी सांगत नाही*
*ते मात्र सारे सहज विसरून जातात*
*मला जमत नाही.*
*मला माहीत आहे या देवदेवांच्या देशात*
*चार्वाक चिरडला गेला नि 'बुद्ध' अवतार झाला*
*तशी तू होऊ नयेस म्हणून*
*वाटल्यास लवकर येवू नको.*
*झालोच आहे उदास ! पियीन पुष्कळ*
*संभोगात शोधील सुखासारखे काहीतरी*
*यायचे असेल तेव्हाच ये, पण येशील तेव्हा*
*निदान तुझ्याजवळ आंबेडकरांची जळजळ असू दे !*
*कारुण्य, कळकळ तरी असू दे !*

• • •

# जसे होते पूर्वी तसेच आहे

जसे होते पूर्वी
तसेच अजून आहे
याला कारण कष्टकरी समाज आहे.
स्त्री शूद्रअतिशूद्र आहेत
जी विटंबना झाली द्रौपदीची
आजही होत आहे
पण प्रतिकार हिन बाईचाच होत आहे
विटंबना करणारे शुरवीर
शुद्र समाजातील हिंदू असतात.
जर तेव्हा कृष्णाने कौरव पांडवांची
कत्तल केली असती तर
नागडी धिंड खेडोपाडी
दुबळ्या आई - बहिणींची निघाली नसती.
पण जसे कौरवांना स्त्रीसौंदर्य
स्त्रीशरीरातील स्वर्ग बघायचे होते
तसेच पांडवांना अन् कृष्णालाही बघायचे
म्हणून तो मुंडकी मारण्याऐवजी
साड्यांचे दिंड पुरवित होता.
वेदनाव्याकूळ नाटक बघत होता
दुर्दैव द्रौपदीचे
शरीरात सहा स्वर्ग घेऊन असलेल्या
स्त्रीचे
म्हणून स्त्रीसमर्थक
डॉ. आंबेडकरांनी कायदे केले.
दुर्दैवी द्रौपदीचे वेळी
डॉ. आंबेडकर नव्हते
कायदे नव्हते - कृष्ण होता
आताही दुर्दैव त्या स्त्रियांचे
कौरव आहेत-कृष्ण आहेत
आणि कायदेही आहेत
फक्त क्रांतिकारी कार्यकर्ते नाहीत.

• • •

# कृष्ण

*कथा काव्यातील कृष्ण*
*गोपींनी वाळूवर सोडून*
*ठेवलेली वस्त्रे घेऊन*
*बसतो झाडावर जाऊन*
*बघत न्हाणाऱ्या गोपीकडे*
*एकाही कथा काव्यातील कृष्णाच्या मनात*
*शिल्पे साकार झाल्याचे*
*सुंदर सुंदर चित्रे रंगतदार झाल्याचे*
*अन् कृष्णाचे मन काव्यात्मक झाल्याचे*
*नदीसारखे निर्मळ निर्विकार असल्याचे*
*वर्णन आलेले नाही.*
*कीर्तनकार कथेकऱ्यांनी सांगितलेले*
*ऐकीवात नाहीत*
*किंवा नारी शरीर असते अंतराळापरी*
*वा असते प्रकृती अन् परमेश्वरी*
*असं कीर्तनकार म्हटल्याचे आढळत नाही.*

• • •

# धर्म अवतरले नसते तर...

*'तू काय केले होते ? काही नाही !*
*फक्त तू तारुण्यात आलीस'*
*तुझे तरुणपण त्यांनी घडविले ?*
*असे काही नाही.*
*तुझे सुंदरपण, रंग, रेषा, सुबकपण,*
*नयनमनोहर आकार, अनेक प्रकार,*
*त्यांनी जमा केले ?*
*फळाफुलांकडून ? वृक्षवल्लरीकडून ?*
*असेही नाही !*
*सुख आणि शांती, रुप आणि तृप्ती*
*फुलविली कोणी*
*तुझ्या कायेच्या कणाकणातून ?*
*त्यांनी ?*
*तसे नाही !*
*तरी धर्म तुला वैरी मानीत अवतरले !*
*अन् त्यांचे ईश्वर तर*
*तुझे स्पर्धक होवून संगरात उतरले.*
*तरी तुझ्या कामलुब्ध डोळ्यांची सर*
*तुझ्या प्रेमलुब्ध नजरेचे मोहकपण*
*तुझ्या क्रुद्ध डोळ्यांचे सुंदरपण*
*एकाही परमेश्वराने कधी दाखवले नाही*
*मी पाहिले नाही.*
*तुझ्या आलिंगनातील आगळा आनंद*

एकाही देवाने, देवळाने दिलेला नाही
तुझ्या सहवासात साक्षात सुख असते
तुझ्या स्पर्शात सुखानंद असतो.
हे तुझे साक्षात्कारी
सुखसुंदर अस्तित्व
अजरामर आहे
शरीर नश्वर असूनही !
म्हणून तुझ्या देव-देहाची निर्भत्सना
देव आणि धर्माने सतत केली आहे
देव आणि धर्म अस्तित्वात
आले नसते तर
शिवी अस्तित्वात आली नसती !
तू अपमानित झाली नसतीस !
स्वामिनी असतीस !
जननी आहेसच !

• • •

# अहिंदू होतो !

*माझे मनी सतत असते*
*इथे जन्मलो नसतो तर बरे झाले असते*
*शूद्र, अतिशूद्र झालो नसतो*
*अनंत अपमान सहन करावे लागले नसते*
*आणि सभोवर दुःख, दैन्य, दुर्दैव*
*दृष्टीस पडले नसते*
*व्यथा, वेदनांचे वारुळ*
*माझे मन आणि शरीर झाले नसते.*
*तिकडे चर्च, मशिदीत तरी माझ्याशेजारी*
*माझ्यापरी व्याकूळ, व्यथित*
*धनवान तरी दिसला असता*
*हिंदू वास्तवाचा विसर तरी पडला असता.*
*भासाचा भिकार आनंद तरी घेतला असता*
*पण दुर्दैवाने माझा जन्म इथे झाला*
*पण इथल्या  चंद्रसूर्यांनी*
*पाऊसपाण्यानी, उनवाऱ्यानी मात्र मला*
*अस्पृश्य मानले नाही.*
*माझ्या बायकोचे विटाळचंडाळाचे कपडे*
*वाळवले, दोन हातात खेळवले*
*इथला निसर्ग वैदिकासारखा वेडा नाही*
*म्हणून त्याने मला*
*बाप व्हायला लावले*

नव्या जिवाला जन्म घ्यायला लावले
निसर्गाला मी नकोसा असतो तर
त्याने मला पशूपक्ष्यांत लोटले असते
वा आफ्रिकेत, अमेरिकेत धाडले असते
परंतु त्याने नानारंगरसाच्या नंदनवनात,
या देशात वेदांच्या आधीही जन्माला घातले
असा 'मी' वेदांच्या आधीचा असताना
अस्पृश्य कसा ?
म्हणून माणसाचा अवमान करणारा धर्म
मी मोकलून देतो !
अहिंदू होतो !
हे मी निर्भयपणे जाहीर करतो !

• • •

## ज्याने केली चूक इथे जन्म घेण्याची !

*जे जातील दूरदेशी*
*होतील भिन्नभाषी, भिन्नवेषी*
*विसरतील स्वदेशाशी, आणि संस्कृतीशी*
*त्यांचे मी स्वागत करतो, सत्कारही करतो*
*आणि जे विसरु शकत नाही*
*बदल करु शकत नाहीत*
*मार खाऊन शतशतकांचा*
*त्या कोडग्या दगडांना मी विचारतो,*
*'कोणी विचारले जर*
*तर सांगाल काय,*
*मी शूद्र आहे !*
*शूद्रातलाही अस्पृश्य आहे !*
*आणि कोणी विचारले जर*
*अस्पृश्यता म्हणजे काय ?*
*कॉलरा, कॅन्सरची ती धाकटी बहीण आहे काय ?*
*किंवा अंध भाऊबंदकीची बहीण आहे काय ?*
*किंवा अदृश्य रोगराई आहे काय ?*
*अस्पृश्यता म्हणजे आहे काय ?*
*जगाच्या पाठीवर प्लेग आहे, कॉलरा आहे*
*तशी अस्पृश्यताही आहे काय ?*
*द्याल उत्तर ?*
*सांगाल सत्वर ?*
*"ती हिंदूधर्माचीच लेक आहे !"*
*अथवा दुसऱ्याने विचारले जर*
*अस्पृश्य असतो तो दिसतो कसा ?*

*संसर्गजन्य रोगासारखा ?*
*की प्रेषितांना पिडणाऱ्या सैतानासारखा ?*
*तर सांगाल सत्वर ?*
*'तो मीच आहे !*
*हिंदू होतो म्हणून अस्पृश्य झालो !*
*हिंदू होतो म्हणून दुःख दैन्यात, उपेक्षेत मेलो !''*
*हे सांगू शकाल पटकन ?*
*म्हणून मी म्हणतो,*
*ज्याने केली चूक इथे जन्म घेण्याची*
*त्यानेच ती सुधारली पाहिजे*
*अशोकापरी भीषण युद्धे करुन !*
*आंबेडकरांपरी प्रचंड प्रखर प्रचार करुन !*
*अथवा धर्मत्याग करून !*
*मोझेसप्रमाणे देशत्याग करून !*

• • •

# अहिंदू

*पंढरीचा पांडुरंग*
*अहिंदू होता काय ?*
*तो कसा काय*
*चोख्या तुक्याला संत मानीत होता ?*
*शूद्र, अतिशूद्र मानीत नव्हता.*
*त्याने मनूला ऐकले नव्हते काय ?*
*त्याच्या या बडाव्यांमागे कोण होते ?*
*बुद्ध होता ? की ख्रिस्त होता ?*
*महंमद होता ? की झरतुष्ट होता ?*
*विठोबा कोणाकोणाशी चर्चा करत होता ?*
*विठोबा एवढा अब्राह्मणी कसा ?*
*अहिंदू कसा ?*
*त्याने चोख्याला एवढा वाव दिला कसा ?*
*हे अजून कळले नाही मला.*

• • •

## महाकवी जोतिराव फुले

*आदिम आदाम-ईव्हच्या आधीची*
*नैसर्गिक बंधुता वैदिकांना मारायची होती*
*आणि विषमता वृद्धिंगत करायची होती.*
*म्हणून त्यांनी*
*हिंसाचाराचा प्रचार फार केला*
*सूर-असुरांची युद्धे,*
*देव-दानवांची युद्धे,*
*दैत्य-देवींची युद्धे,*
*युद्धेच युद्धे !*
*प्रत्येक प्रचारी पोथीत युद्धेच युद्धे !*
*नैसर्गिक सहजसुलभ बंधुता*
*आणि वैश्विकता मारायची होती.*
*म्हणून गीतेपर्यंत सतत*
*हिंसाचार सांगत सांगत आले*
*द्वेष, मत्सर, तुच्छता, तिरस्कार*
*हे हीनभाव धार्मिकतेचा नैतीकतेचा*
*संस्कार करीत आले.*
*हे सत्य*
*बुद्धानंतर महात्मा फुल्यांना दिसले.*
*ते म्हणू लागले,*
*'पृथ्वीवरचे आपण सर्वजण*
*निर्मिकाचे प्रजाजन*
*आपण कला, कौशल्य आणि कष्ट करणारे बहुजन*
*म्हणूनच सर्जकही !*
*आईच्या उदरातून जन्मलो*
*म्हणून बंधुजन*
*दहा अधिक चार भोकावाला ब्रह्मा*
*आपला कोणी नाही.*
*तसाच तो तुर्कांप्रमाणे आक्रमक असलेला*
*आणि विजयी झालेला परका विष्णू*
*आपला कोणी नाही.'*

● ● ●

# ज्योती फुले म्हणतात....

*वाघ सिंह जर झाले*
*ग्रंथकार, स्मृतीकार*
*तर ते जोडीदार मादीला*
*मानतील समसमान*
*आणि लेकूरवाळीला देतील बहुमान*
*करतील सन्मानाने सत्कार*
*वानराचे वंशज वैदिक*
*जर झाले वाघ सिंह*
*आणि वागू लागले वैदिकांसारखेच*
*तर त्यांच्या माद्याच त्यांना*
*फाडून खातील टराटर*
*स्त्री शरीराचा अपमान करणाऱ्या वैदीक वेड्यांना*
*बोलवतील घारी गिधाडांना*
*देतील मेजवान्या वैदिकांच्या रोजच्या रोज*
*ताज्या*
*मेजवान्यांचे कार्यक्रम लांबत जाणार*
*असे दिसते सविता .. सावित्रा*
*सावित्रा, बघता आहात ना तुम्ही !*

• • •

# स्त्री

*तुझे अंगअंग आनंददायक*
*तुझे सर्वचकाही सुखदायक*
*आनंद उत्सवामागे उत्सव साजरे करीत*
*तू आई होतेस*
*देतेस जन्म जीवाला.*
*पण तुझ्या प्रतिस्पर्ध्याला-देवास*
*प्रिया, पत्नी, गृहिणी, आई होता येत नाही*
*तुला पराभूत करता येत नाही*
*म्हणून तो परमेश्वर झाला !*
*उभारीत राहिला मंदिरांमागे मंदिरे*
*तरी तू आनंददायक, सुखदायकच राहिलीस.*
*नंतर तो परमेश्वर झाला*
*मोठमोठी मंदिरे मागू लागला.*
*तरी तू गृहिणी राहिलीस*
*अन् आनंददायकच राहिलीस*
*जशी होती पूर्वी तशीच राहिलीस.*
*त्याचप्रमाणे तुझे उदात्तीकरण*
*कोणी केले नाही*
*तुझी निंदा, निर्भत्सना उलट वाढत राहिली*
*विटाळशी, चांडाळशी*
*प्रत्येक महिन्याला होणारी*
*म्हणून अमंगळशी !*
*षड्विकारांचे जळते घर असणारी !*
*तुझ्या दाराजवळच नरकाचे दार असते*

*तुझ्यात रमले तर स्वर्गाचे दार*
*कायमचे बंद होते*
*तो चिडतो आणि दुःखाचे डोंगर अंगावर फोडतो !*
*हा प्रचार ऐकूनही मी तुझाच राहिलो*
*वासना विकाराला आनंदोत्सव मानीत राहिलो*
*तुला सतत नवी नवलाई, सुखदायी,*
*जीवनाची आई मानित राहिलो*
*रणात, वनात, जीवनाची साथीदारच मानीत राहिलो.*
*पण प्रिये आता जीवनाच्या लढाईत*
*रुग्णाईत झालो आहे, जखमांनी जर्जर झालो*
*तू आता दवादारु हो, दवाखाना हो !*
*शुश्रूषा हो, मधालय हो !*
*मंदिर, मदिरा हो, सुरा हो, कारां हो !*
*काहीही कर पण मला बरे कर !*
*शूरवीर कर !*
*तू हे करशील ही शाश्वती आहे मला*
*तू प्रिया होतेस, पत्नी होतेस,*
*आई होतेस, गृहिणी होतेस,*
*मुलांची दाई होतेस.*
*ही तुझी सुखदायी रुपे पाहून*
*निसर्गाने तुझेच अनुकरण केले*
*तू माझी, माझ्या मुलांचीच नाही*
*तर निसर्गाचीही शिक्षिका झालीस !*
*हे मला ठावे आहे*
*धन्यवाद, प्रिये तुला !*

• • •

# कोळीवाड्यातील कष्टकऱ्यांच्या मेळाव्यात

शेतकऱ्याच्या सहज शांतपणाने
ज्योतीराव फुले मेळाव्यात सामील झाले
त्यांच्याकडे पाहून एकाला वाटले
संत नामया असेच असावेत.
दुसऱ्याला वाटले-
संत चोखया असेच असावेत
तिसऱ्याला वाटले-
संत तुकया असेच असेच शांत शहाणे असावेत.
त्यांचे विचार ऐकून
बोली भाषण पाहून
शूर शिवाजी शेतकऱ्यांशी
असेच आपल्यापणांने बोलत असावेत
ज्योतीबा फुले बोलतच होते.
त्यांचे विचार ऐकून
लोक आनंदाने ओरडले
तुक्या चोख्याचा अवतार
झिंदाबाद झिंदाबाद !
शूर शिवाजीचा अवतार
झिंदाबाद झिंदाबाद !
शूद्र संताचा अवतार
झिंदाबाद झिंदाबाद !
शूद्र शुरांचा अवतार
झिंदाबाद झिंदाबाद !
महात्मा फुले
झिंदाबाद झिंदाबाद !!
ज्योतीराव फुले म्हणाले,
तुम्ही पेरता, तुम्ही जोपासता
तुम्ही जागवता जग आणि जीवन
तुम्ही पृथ्वीवरले निर्मिक

तुमच्याशिवाय तुमच्या एवढे
मोठे दुसरे कोणी नाही.
जसे निर्मिकाने निर्मिले तुम्हाला.
तसेच निर्मिले ग्रहगोल ताऱ्यांना
खगोलातील लहान मोठ्या ताऱ्यांना
ते सारे, पाऊस पाणी वारे
आणि तुम्ही कष्टकरी सारे
सख्खे भाऊ  भाऊ
म्हणून नेमाने भेटीसाठी
भावामागे भाऊ येतात भेटीला
तो एक निर्मिक - तुम्ही एक निर्मिक.
तुमच्याआधी वेद नाहीत
असेलच तर असेल आभाळ
आणि अग्नीबंबाळ ग्रहतारे
किंवा पाऊस पाणी वारे.
भट बामण तुमच्याहून थोरले नाहीत
थोरले नाहीत ती भंगार बुके
ती वनचर वणवण भटकणाऱ्या
भटक्याची बुके.
ज्यांनी पाहिले नव्हते टिकाव फावडे
ज्यांना माहित नव्हते छन्नी हातोडे
ठाऊक नव्हते वखर नांगर विळा खुरपे
कुंभाराचे चिखलाला आकार देणारे चाक
अन् लोहाराचा घण ऐरण.
माहित नव्हता
झाडा झुडपाएवढे अज्ञानी
त्यांचे ज्ञान केवढे ?
कमरेला फांद्या बांधण्याएवढे ?
अरण्यातील पशूएवढे
वनातील असल्याने हिंसक फार
अन्यायी अत्याचारी फार.

ते लढाया जिंकले आपण हरलो
झुंजीत वाघ भरतो भारी
पण नंतरचा इतिहास ?
पराभवाचा इतिहास
अन आपला इतिहास
किती दैदिप्यमान
कबीराची बरोबरी कोण करील ?
संत तुकाराम चोखामेळा सावतामाळी
सेना न्हावी नामदेव शिंपी
नरहरी हे जगाला भारी
अन् आपले महापराक्रमी शिवाजी महाराज
जगन्मान्य सेनापती
जर झालीच दुसरी लढाई
भारताचा उद्धार आपण करणार
स्त्री, शूद्र, अतिशूद्राची मुक्ती
निर्मिकाला हवी ती समता बंधुता
आपण चिरायू करणार
आपण करतो ते कार्य महन्मंगल असते
माणसाला लहान करणारे नसते.
तर बंधूंनो,
मी लढाई सुरु केली आहे-
माझ्या सावित्राने उभारलेल्या बंडात
सामील व्हा !
'महात्मा फुले'
'झिंदाबाद'
'सावित्राबाई फुले'
'झिंदाबाद'
'जातीभेद'
'फेक देव'
'समता, बंधुता, एकता'
'आणूच आणू.' • • •

# देव, दु:ख आणि माणूस

*दरेक पोथीतला दरेक देव*
*फार लहान आहे माणसाला*
*प्रत्येक पोथीचा जन्म माणसापुढे झाला.*
*तसा प्रत्येक देवाचा जन्मही माणसापुढे झाला*
*माणसात राहूनही,*
*देवाला सामाजिक समज आली नाही*
*गाई बैलाएवढाही तो माणसाळला नाही*
*कुत्र्या मांजराएवढाही तो माणसाच्या साह्याला आला नाही.*
*देव लहानसेही शहाणपण दाखवत नाही*
*फार पूर्वीपासून*
*माणसाची लढाई दु:खाविरुद्‌ध आहे*
*अनेक दु:खे आणि दु:ख देणारे*
*लढायात माणसाने मारली आहेत*
*तरी दु:खे आणि दु:खे देणारे पुष्कळ बाकी आहेत.*
*माणसांना ती स्पष्ट दिसतात*
*देवाला ती का दिसत नाहीत ?*
*दु:खेही मर्त्य आणि ती देणारेही मर्त्य*
*दोघेही अजरामर नाही*
*देव त्यांच्याविरुद्‌ध लढाई*
*का छेडीत नाहीत ?*
*देवाला भुरळ पडावी अशी*
*दु:खे दिसायला देखणी नसतात*
*लोभ जडावा अशी*

*कलाकुशल आणि नखरेल नसतात.*
*दुःखे दुःखासारखीच दिसतात*
*याचना प्रार्थनांसारखी प्रेम फोडणारी नसतात*
*तरी देवाची दुःखावर एवढी कृपा का ?*
*दुःख आणि देव भाऊ  भाऊ  आहेत का ?*
*असले तरी हरकत नाही*
*दुःखाविरोधाची लढाई*
*माणूस मागे घेणार नाही*
*पृथ्वीवर दुःखाला राहू देणार नाही*
*हे देवांनी विसरु नये.*
*पृथ्वीवर राहतील फक्त*
*काव्यातील कलात्मक दुःखे*
*कलेतील रसात्मक दुःखे*
*ही दुःखे वासनाविकारातून जन्माला येतात*
*आणि वासना विकार*
*सजीव शरीराचे आविष्कार असतात.*

• • •

## दवाखाना

*या घराघरातील अज्ञान अंधार*
*दु:खे दैन्ये बेसुमार*
*याला जबाबदार*
*संसार करणारी माणसे नाहीत.*
*त्याला कारण*
*वर्णविषमतावादी संस्कृतीचे संस्कार आहेत.*
*ते संस्कार दृश्य अदृश्य आजार आहेत*
*हे आजार देशभर घरोघरी आहेत*
*म्हणून दुर्दैवाचा प्रतिकार झाला नाही.*
*दुर्बल देश दास झाला*
*माणसाला गुलामी प्रिय नाही*
*बुद्धाच्या देशाला दास होणे पसंत पडणार नाही*
*म्हणून देशभक्त आंबेडकर डॉक्टर आंबेडकर झाले,*
*देशातील अदृश्य आजार दूर करण्यासाठी*
*दवाखाना घेवून गांधीजींकडे गेले*
*देशभक्त गांधीजी म्हणाले,*
*डॉक्टर आंबेडकर उघडा तुमचा दवाखाना*
*पराभव पाहणारा हा आपला आजारी देश दुरूस्त करा*
*देशाचे संविधान डॉक्टर आंबेडकरांचा दवाखाना.*

• • •

# बुद्धानंतर

*बुद्धानंतर
तिने ढुंकूनही पाहिले नसेल
पण आता ती येईल हो येईल
मी देतो हवी तेवढी शाश्वती -
कारण पाहिलेय तिने खिडक्या खिडक्यातून
तिचे परमप्रिय प्रियकर
डॉक्टर आंबेडकर.
चुरचुर करून टाकीत आहेत अडथळे
अन् मनूने मारून ठेवलेल्यांना
करीत आहेत जिते जागते
अन् देत आहेत हातात हत्यार
करीत आहेत अमृतमय उपदेश
ऐकून ती एकमेका ठायी
शंभर शंकरांचे शौर्य आले आहे
आता ती फार प्रसन्न आहे
बोस्टनला जे झाले
मास्कोला जे झाले
झाले ते दिल्लीत होणार नाही
तिच्या सौंदर्याला गालबोट लागणार नाही
निरघोळ आवरून धरण्याची
पदर सावरून धरण्याची
आता गरज नाही
तिच्या प्रिय प्रियकराने
तिची खूप काळजी घेतली आहे
ती आनंदून गेली आहे
उत्सुक झाली आहे
बुद्धाच्या घरी येण्यासाठी.*

• • •

# विठोबा

*अयोध्येच्या रामाएवढा*
*तू जगजाहीर वर्णवर्चस्ववादी नाहीस*
*अयोध्येच्या ब्राह्मणांनी*
*आमच्यासाठी आत्मतेजोबल बंडे उठवली*
*अन् त्यांने शंबुकाचा शिरच्छेद केला*
*तसे तू केले नाहीस*
*संत तुकारामा विरुध्द*
*तसाच निंदेचा प्रचार प्रलय उठवला*
*तरी तू त्यांच्याशी*
*बोलत राहिलास*
*स्वार्थ असेल तुझा*
*तुकोबाच्या अमर अभंगानी*
*अजरामर व्हायचे असेल तुला*
*ब्राह्मणांना खलनायक*
*करायचे असेल तुला*
*म्हणून चोख्याविरुद्‌ध तू*
*ब्र शब्द नाहीस काढला*
*म्हणून शूद्र समाजातील*
*अवघ्या कवींनी तारणहार मानले तुला*
*बाजूला ठेवून रामाला*
*घरोघर नेले तुला.*

• • •

# प्रवचने

*तथागत गौतमबुद्धाची प्रवचने ऐकून*
*लोक गेले प्रज्ञेने प्रखर आणि प्रभावी होऊन*
*दु:खे दिसू लागली त्यांना स्पष्ट !*
*तसेच दु:ख देणारेही दिसू लागले स्पष्ट !*
*दु:ख देणारे दुष्ट दूर करता येतात*
*आणि दु:खेही नष्ट करता येतात*
*दु:खे व ती देणारे नसतात रोगराईप्रमाणे अदृश्य*
*आणि नसतात मृत्यूप्रमाणे प्रबळ*
*हे ही लोकांना झाले स्पष्ट !*
*दुसरेही झाले स्पष्ट !*
*दु:खे आणि दु:ख देणारे मातीच्या मुखी देता येतात*
*त्याने माती आनंदीत होते*
*तसाच निसर्गही आनंदित होतो*
*आणि कोणीच करीत नाही शोक, संताप व्यक्त*
*निसर्ग आणि नियतीही आनंदित होतात*
*प्रगतीला पुढे खेचतात*
*जीवनाला गती देतात*
*निसर्गाचा कल सुख समृद्धीकडे असतो*
*म्हणून उन्हाळ्यानंतर पावसाळा येत असतो*
*हे सत्य प्रकाशापरी घरोघरी स्थायीक झाले*
*बुद्धाचे विचार मनोमनी माहीत झाले*
*म्हणून लहान लहान मानलेले*
*महान महान होताना दिसू लागले*
*काळोखात कोंडलेले प्रकाश होवून*
*एकामागे एक पुढे येऊ लागले*
*देशच प्रबुद्ध होऊ लागला*
*बुद्धमय होऊ लागला*

• • •

# सिद्धार्था गौतमा बुद्धा

*सिद्धार्था गौतमा बुद्धा*
*कधी कधी मनामधी*
*शिरतो सुगंधापरी विचार*
*धारण करावे चिवर*
*व्हावे बौद्ध भिक्षू प्रखर*
*सांगत जावे परोपरीने बुद्धविचार*
*फिरत रहावे लोकानुकंपेने*
*दूरदूरवर जावे*
*वाटा पायवाटा आहेत तिथवर जावे*
*बोलत, कष्टत रहावे*
*विझेपर्यंत ज्योत जी*
*प्रकाशते अंतरी तो पर्यंत कार्य करीत रहावे*
*करावा बुद्धाचा भारत*
*पुनरपी बौद्धमय भारत*
*अजून कित्येक युगे*
*काळोखाचा कैदी भारत*
*राहू द्यावा आम्ही ?*
*तर कधी कधी मनामधी*
*शिरतो तलवारीपरी विचार*
*फिरावे वाटीत बंदुका*
*शस्त्रांच्या सामर्थ्यावर*
*संबोधीच्या साथ सोबतीने*

*टाकावा बदलून भारत*
*करावा बौद्धमय आंबेडकर भारत*
*मनामनातला काळोख करून गोळा*
*द्यावा फेकून दूरवर*
*नभाच्या पलीकडे काळोखात काळोख*
*अन् करावा पुन्हा प्रकाशमान भारत*
*अन् माणूस महान*
*कधी कधी मनामधी येतो आणखी विचार*
*अशोका परी उभरावेत स्तंभ जागोजाग*
*पूर्वी प्रमाणे स्त्रीची अवहेलना*
*केली कोणी जर*
*अन् पूर्वीची तुच्छता तिरस्कार*
*माणसाबद्दल कोणी दाखविला जर*
*मानला जाईल तो संविधानाचा अवमान*
*मनुपरी देशाचा मारेकरी ती व्यक्ती मानली जाईल.*

• • •

# बुद्ध, फुले, आंबेडकर : भारत भाग्यविधाते

*तथागता, सिद्धार्थ गौतम बुद्धा*
*पहिल्या प्रथम*
*दु:ख दिसले दुनियेत तुम्हाला*
*अन् दु:ख देणारे*
*दु:खाची कारणे*
*पहिल्या प्रथम कळली तुम्हाला*
*पहिल्या प्रथम तुम्हीच*
*पिता परमेश्वराला*
*पिढ्यान पिढ्याची आत्म्याच्या साखळीची भानगड*
*नाकारली, ठोकरली*
*माणूस आणि समाज*
*माणूस आणि मन*
*मान्य करणारेही तुम्हीच पहिले*
*आणि कार्यकर्त्यांना,*
*चरिथ भिकवे चरीकम,*
*बहुजन हिताय बहुजन सुखाय*
*लोकानुकंपाय सांगणारेही तुम्हीच पहिले*
*परमेश्वर नाही,*
*स्वर्ग नाही*
*आत्मा नाही*
*म्हणून मंत्र नाही, यंत्र तंत्र नाही*
*आणि भुकेलेले भयंकर यज्ञही नाही*
*माणसाला सूर्यासम स्वतंत्र*
*समाजाला प्रजातंत्र*

*सांगणारे ही तुम्हीच पहिले*
*अन् बहुजनांनी जे जगविले ते जगते*
*अन् बहुजनांनी जे मारीले ते मरते*
*बहुजन हा नेता नियंता*
*भारत भाग्यविधाता आहे*
*हे ही ओळखणारे पहिले तुम्हीच*
*पण तुमच्या या मनाने*
*बामणशाही, राजेशाही मरते*
*म्हणून दोन्ही शक्तीने*
*माणसाला,*
*सूर्यासारखा स्वतंत्र होऊ दिला नाही*
*त्याच्या प्रज्ञेचा प्रकाश पसरु दिला नाही*
*त्याला काळोखाच्या कैदेत कोंडला*
*प्रज्ञातंत्र गाडून,*
*फुले आंबेडकर येईस्तोवर*
*भारतभर अंधारच अंधार होता*
*कष्टकरी गतजन्माचा पापी गुन्हेगार होता*
*ओरबडून फेकून दिला मनातील अंधार*
*केले कष्टकऱ्यांना क्रांतीकारक*
*अन् केले नेता नियंता अन् पुढार*
*बौद्ध, प्रकाशमय भारत केला निर्माण*
*प्रथम भगवान बुद्धाने, दुसऱ्यांदा भीमाने*
*आता आधुनिक भारताचा इतिहास*
*होईल बौद्धमय भारताचा इतिहास*
*अन् प्रलयकारी प्रतिकाराचा इतिहास*
*पराभवांचा नाही*
*ती रोगराई केलीय खलास.*

● ● ●

## डॉ. आंबेडकर

*तेही होते आपल्यासारखेच तरुण*
*आपल्याप्रमाणेच*
*हिंदू संस्कृतीत वाढत*
*उपेक्षा, अपमान सहन करीत*
*अनेक अभावात*
*आपल्याप्रमाणेच अडखळत*
*आपल्याप्रमाणेच*
*त्यांनाही दिसली दुःखे*
*आणि दुःख देणारे*
*पण*
*ते लढलढले, लढत राहिले*
*दुःखाविरुद्‌ध,*
*दुःख देणाऱ्यांविरुद्‌ध !*
*आणि टाकली त्यांनी*
*अनेक बंधने तोडून*
*देशाचा दुश्मन*
*आणि महिलांचा मारेकरी मनूचा*
*टाकला खुर्दा करून*
*आपणही आहोत तरुण*
*त्यांचा शब्दन्‌शब्द*
*आपण आहोत पाठ करून*
*पण किती मुक्त केले*
*महिलांना ?*

आणि किती पुढे नेले
देशाला ?
बघूया आपण
विचार करकरून
जिथे जन्मते क्रांती
तिथेच आपण जन्मलो आहोत
पण आपण आहोत काय
क्रांतिसारखे तेजस्वी अन् तरुण ?
की आहोत नुसते
पती आणि पिता
होण्याएवढेच तरुण ?

• • •

# हे स्वातंत्र्या, तुकोबा, चोखोबाला तू दिसत नव्हतास

*हे स्वातंत्र्या, तुका, चोखोबाला तू दिसत नव्हतास*
*भासमानही होत नव्हता*
*म्हणून ते वाळूच्या विठ्ठलाला*
*व्यथा वेदना सांगत होते*
*विठ्ठलाला तारणहार मानत होते*
*मला तू दिसतोस म्हणून मी*
*विठ्ठलाला वाळूचा मानतो.*
*हे स्वातंत्र्या, मला तू दिसतोस*
*म्हणून मी माझ्या व्यथा-वेदना तुला सांगतो*
*माझ्याप्रमाणे तू तुका-चोखाला*
*दिसला असतास तर*
*त्यांनी तुला व्यथा-वेदना सांगितल्या असत्या*
*आणि विठ्ठला प्रमाणे तुला ही*
*घरोघरी नेले असते*
*अजरामर केले असते.*
*ते प्रचंड प्रतिभावान होते*
*तरी ते फार हिंदू होते*
*म्हणून ते ब्राह्मणाला भित होते*
*तसे ब्राह्मण काहीच नव्हते*
*प्रत्येक आक्रमणापुढे ब्राह्मण हरले*
*अन् शतकानुशतके गुलाम राहिले*
*स्वातंत्र्य कधी त्यांनी आणले नाही*
*आणू दिले नाही,*

शिवाजीच्या सेनेमध्ये ते सामील झाले नाहीत,
लढले नाहीत,
स्वातंत्र्या,
गांधी-आंबेडकरांनी तुला साकार केले
सजीव केले, लोकात नेले
मला भेटविले
तू मला दिसला नसतास तर
माझीही स्थिती तुक्या, चोखया, नाम्या
सारखी झाली असती
मीही विठ्ठलालाच हाका मारल्या असत्या
व्यथा-वेदना सांगितल्या असत्या
तरीही माझी मौत फार बोलतो म्हणून
तुक्या, चोखया, नाम्यासारखी झाली असती
पण आता मला कोणी अरे म्हटले
तर कारे म्हणणारे हत्यार घेवून
उठतील, लढाया सुरु करतील
शेकडो शस्त्रागारे माझ्यापाशी आहेत
असा विश्वास, आत्मविश्वास
तुका-चोखाला
असता तर त्यांनी देव-देवळांना
दगड मानलं असतं,
ते एवढे प्रतिभावान की,
पत्थरे अजरामर होऊन पुज्यनीय होऊन
अजूनही आहेत
तू त्यांना दिसला असतास
तर तूही घरोघरी, मनोमनी असतास
अजरामर झाला असतास.

• • •

## स्वातंत्र्या-१

*स्वातंत्र्या,*
*मी उभा आहे*
*तुझ्या स्वागतासाठी*
*गुंफून श्रद्धा, भाव-भावनांचे हार*
*घालाया तुझ्या गळी हे हार*
*स्वातंत्र्या, !*
*येशील घेवून माझ्या*
*तृषीत मनातील आणि स्वप्नातील बरेचसे काही*
*पाहून तुला आणि तुझ्या हातातील*
*माझ्या स्वप्नं साफल्यांना*
*प्रसन्न होतील माझे प्रज्ञावंत हात*
*द्यायला तुला साथ*
*न्यायला तुला गोरगरीबांच्या घराघरात*
*झोपडी-झापात*
*तू राजगादीवर बसलास तेव्हा*
*माझ्या मनात केवढा उल्हास होता*
*आणि काव्य-कल्पनांचा*
*केवढा विलास होता*
*आनंदाने मी ओरडलो होतो*
*इन्कलाब झिंदाबाद ! इन्कलाब झिंदाबाद !*
*पण आले हे खिन्न, कोरडे, काळे-सावळे दिवस*
*आले नसते तर फार बरे झाले असते*
*झालो नसतो एवढा निराश*
*अन् एवढा उदास !*
*सरून गेल्या नसत्या श्रद्धा*

*आणि सुकून गेल्या नसत्या भाव-भावना !*
*आणि उरला नसता नुसता संताप*
*नसते सळसळले माझे बाहू*
*आणि ज्यांनी सहन केली*
*अनेक दुःखे ते माझे मन*
*प्रक्षोभक होऊन उठले नसते*
*दुःखे देखून, देववत झालेले मन*
*आणि प्रकाश पिवून पुनीत झालेले मन*
*मी बुद्धाला वाहाण्याचे ठरविले होते*
*चरिथ भिकवे चरिकम !*
*हे जीवन मी अंगिकारण्याने ठरविले होते*
*ते माझे प्रज्ञावंत झालेले हात*
*मी बंदुकांना देऊ?*

• • •

# स्वातंत्र्या-२

*जळत्या ज्वालेपरी*
*जे आहेत तेजस्वी अन् तरुण*
*जे कैक अरिष्टावर अभावावर मात करुन*
*उरतील विजय होऊन*
*ते कर्मवीर तरुण*
*त्यांच्या कर्मवीर हातांचा*
*आणि प्रचंड प्रखर प्रज्ञावान मनाचा*
*कोंडमारा असह्य होऊन*
*घेत आहेत स्वत:ला विझवून*
*अध्यात्मिक अंधारात शिरुन.*
*हे स्वातंत्र्या !*
*तू आलास खरा*
*दिसतोस खरा*
*परंतु आंबेडकरांची क्रांतिकारक करुणा विसरुन*
*गांधीजीची गंगेपरी अपार ममता विसरुन*
*म्हणून अनेक तरुणांना काम नाही*
*म्हणून म्हणतात अनेकजण*
*जाऊया का आणाया बंदुका*
*लढ लढून टाकूया का बदलून*
*हे आपले स्वातंत्र्य ?*
*हे स्वातंत्र्या !*
*तू तरुणांचा लाडका व्हायला हवं होतं...*

• • •

## स्वातंत्र्या-३

*तू दिले स्वातंत्र्य*
*म्हणून कंबरेला तलवार, खांद्यावर बंदूक*
*आता सर्वांच्या आली आहे*
*असे पूर्वी कधी झाले नाही*
*म्हणून पारतंत्र्य आले*
*स्वातंत्र्या,*
*आता पारतंत्र्य कधी येणार नाही*
*पराभव कधी होणार नाही*
*आता सर्वांठायी लोकशाही आहे*
*असे पूर्वी असते तर*
*भारताचा इतिहास दु:खाचा झाला नसता.*

• • •

# स्वातंत्र्या

*स्वातंत्र्या,*
*युरोप अमेरिकेत तू उभारलेस*
*तसे इथेही जीवन आणि जग उभार !*
*म्हणजे हे तरुण*
*दुःख घेऊन, दुःख होवून*
*चौकाचौकात दिसणार नाहीत*
*असे काहीतरी कर*
*कवी आणि कार्यकर्ता असूनही मी*
*अवसेसारखा खिन्न असावा काय ?*
*पूर्वे सारखा प्रसन्न नसावा काय ?*
*हे तू ठरव*
*नाहीतर माझ्या कविता*
*क्रांतीच्या डरकाळ्या होतील*
*काय ते तू ठरव ?*

• • •

# नसेल दास

*उद्या मी मुक्त होईल*
*नसेल मग कोणाचाच दास*
*माझा क्षणक्षण*
*निर्मील सुखांची रास.*
*माझ्या उरलेल्या श्रमाने*
*चेतून जातील तास*
*श्रमसकल सुखसंवन*
*असतील उरातले श्वास.*
*अशा वाढतील तेजाने*
*तळपेल वर्षाचा इतिहास*
*अन् देशा देशांत दरवळेल*
*माझ्या कष्ट कुसूमांचा सुवास !*

• • •

# संगीत

*आकाशाच्या बाजारपेठेतील सुखाचे-*
*व्यापाऱ्याने-*
*सूर्याने-पाण्याच्या पायल्या मोजूनी*
*मेघांची पोती मोजून थापी लावली*
*अन् वाऱ्याला हाक दिली- 'हमाल....!'*
*तशी मारुतीच्या बापाने ती पोती पाठीवर घेतली*
*व तो सरळ सह्याद्रीच्या घरी निघाला*
*मातीतून माणसाला महानपद देणाऱ्याने*
*दोन्ही हात उभारुन केले - 'या राव !'*
*पृथ्वीवर प्रेम करणारा तो नाभीचा नागरिक*
*त्या स्वायत्तेने उल्हासित झाला*
*अन् घनगर्जीत गिते गाऊ लागला*
*तसा सह्याद्रीचा शेजारी*
*शेताच्या सारंगीवर नांगराचा गज फिरवू लागला*
*त्या दोघांनी असे संगीत गायले की*
*दुःख दाती तृण धरून पळून गेले.*
*सुख समाधान वाटीत घरोघर भेटू लागले*

• • •

# पहाट आणि मृत्यू !

*देवांच्या नंदनवनांतून पहाट येते जेव्हा उठून*
*देवलोकीचे तेच ते सुखभोग देखून*
*गेली असते उबून वैतागून*
*निघते मी पृथ्वीकडे स्वर्ग सोडण्याचे ठरवून*
*पृथ्वीचे नागरिक बनण्याचे मनात स्वप्न बाळगून*
*तेव्हा देव आपल्या दांभीक दुष्टपणाप्रमाणे*
*तिला बळे स्वर्गाचीच शोभा वाढवायला सांगतात*
*ती पक्की खट, ती देवांना दाद देत नाही*
*पृथ्वीकडे पळत निघते.*
*तेव्हा ते स्वर्गातील स्वार्थ साधू*
*कृष्णाच्या कुरुक्षेत्रातील कुशल हाताने*
*पहाटेच्या पदरावर मरणाचा कीडा गुपचूप बसवून*
*देतात.*
*पृथ्वीकडे प्रेम प्रसन्न होऊन येताना*
*पूर्वेच्या पायऱ्या उतरत असताना*
*पायात पदर येऊ नये म्हणून उचलून धरते*
*तसे लुच्चेमरण कृष्णाचे ऐकून पृथ्वीकडे येते*
*कुरुक्षेत्रातील सफाईने*
*ते अशुभ पाहून शुभमंगल पहाट पांढरी पडते.*
*भयकंपीत होऊन ती*
*मरणाला पुनः नरकात फेकण्यासाठी*
*मरणापाठी धावत सुटते जीव मुठीत घेवून*
*गल्ली बोळातून, रस्त्यारस्त्यातून.*
*तेव्हा एखादी फॅक्टरी संप करुन*

दरवाजाबाहेर आलेली असते
कामगार वर्तूळ करुन संपनेत्यांचे भाषण ऐकत असतात
घोषणांचे गजर करीत असतात.
ते देखणे दृश्य पाहून पहाट पुन्हा प्रसन्न
आणि पुन: पळणाऱ्या मरणाला मारण्यासाठी
त्याचे पाठी पळत सुटते
त्याच वेळी मरण बंदुकीत शिरते....
ठो, ठो बंदूक वाजते भाषणकर्ता कामगार
खाली कोसळतो, पहाट खिन्न होते शाप देते
देवांना आणि पृथ्वीवरील दानवांना तुषार होऊन.

• • •

## अस्पृश्य

*तू आहेस मानव मनूने तुला मानले नव्हते तरी*
*आणि बहुतेक रणांत तू पराभव पावला तरी*
*तू जीवन सोडले नव्हते. काळोखात स्वत:ला गाडले नव्हते.*
*असा तू तुला कसे म्हणावे पामर*
*तुझ्या दु:खात जन्म पावले कितीतरी देवधर्म*
*आताही स्वातंत्र्य तुझ्या दु:खावर डाग देते तरी तू त्याला*
*प्रेमपान्हा पाजतोस न बोलता शब्दही उणा*
*म्हणून लोका सांगतो की तुझ्या संयमाला नाही तुलना.*
*असली उपेक्षा सोसून संताचाही संत रागवला असता.*
*पण तू शांत आहेस*
*तू थकला आहेस म्हणून नव्हे*
*तर सर्व दु:खाला द्यावया मरणे*
*एक जगड्व्याळ वादळ पोषीत आहेस प्राणपणाने !*

• • •

# कारकून

*हे इंद्राच्या कारकूना चित्रगुप्ता,*
*तू द्यावीस मला तुझी जागा*
*झालास तू खूप म्हातारा म्हणून करतोस तू*
*घोटाळा*
*ज्याचे लिहावेस नाव तू मृत्यूच्या  यादीत*
*ते आपले राजगादीत*
*अन् जीवनाचे निर्माते मात्र गाडीतोस मातीत.*
*म्हणून म्हणतो दे तुझी लेखणी*
*मी करीन अशी खुशीने चाकरी की*
*पृथ्वीवरील जाईल घाण सारी नरकात*
*अन् वसुंधरा होईल पुन: देखणी*
*त्यामुळे तुला आणि तुझ्या देवांना वाटेल*
*यावे धरेवर व्हावे कोठेतरी मैलकुली*
*अथवा कारखाण्यात कामगार*
*करावे खूप काम नि घ्यावा आनंद श्रमाचा*
*आणि घरी बायका मुलांचा.*

• • •

# स्वातंत्र्या

*स्वातंत्र्या,*
*माझ्या लाडक्या देशातील,*
*परमप्रिय स्वातंत्र्या; तुझ्या जन्मापूर्वी*
*आम्ही सर्वांनी केलेले संकल्प होऊ दे*
*पुरे*
*अशी माझी प्रबळ प्रार्थना आहे.*
*उतरुदे पसरुदे मातीवर*
*ती शब्दातील सुंदर सृष्टी*
*होऊदे या तृर्षात मातीवर वृष्टी*
*शब्दांतील त्या संजीवनाची,*
*सामर्थ्याची.*
*मागून घे हक्काने*
*माझी शक्ती, माझी स्फूर्ती, भक्ती,*
*कीर्ती*
*वाटेल तितकी न ठेवता संकोच भीती*
*अथवा कर सक्ती*
*त्या शब्दांतील वसाहतीसाठी*
*वैकुंठासाठी ! पण नाही रे तुजपाशी*
*एवढी*
*शक्ती ! प्रेमाची, स्वामित्वाची...*

• • •

# मराठाचे अग्रलेख

*ही लेखणी रोखू नका*
*तिच्या गतीच्या पुढे हत्ती उभे करु नका*
*तिची व्यथा, स्नेहसंतापाची कथा*
*ध्यानी धरुन टिकेच्या फेकी करा.*
*.... जेव्हा इथे मरणांची*
*मिनिटामागे पाऊले पडत होती*
*घराघरांची, गल्लीबोळांची करुन नाकेबंदी*
*मराठी माणसे कोंडीत धरली होती.*
*त्यावेळी शब्दाचे स्वामी*
*घालून खाली मुंडी*
*जिभेची करुन टाळेबंदी*
*प्रेताप्रमाणे पांढरे होऊन पडले होते, त्यांचे शब्दबळ*
*सडलेले होते.*
*तेव्हा ही लेखणी*
*ज्ञानेश्वरांच्या भाषेतील भव्यता प्यालेली*
*आंबेडकरांच्या अंतरीची आग ल्यालेली*
*तुक्याच्या निस्पृहतेने*
*मरणाला 'मुर्ख' अश्या शिव्या देत पुढे झाली.*
*तो भयाण अत्याचार पाहून*
*लाचार नव्हता प्रतिकार करु लागली*
*या लेखणीतून शब्दांचे सुरुंग*
*दुष्टाव्याच्या डोंगराशी झुंजू लागले.*
*आणखी मित्रांनो,*
*तिच्यातून तुमची तटस्थता*
*जुलमांचे जयगीत गाणारी*

*रामाची नि रावणाची सीता सांगणारी*
*कलात्मकता नाही.*
*नाही तिच्या पाशी मुजोर मरणाला हात*
*देणारी*
*अन्यायाला साथ देणारी*
*पोटावर भात ओढणारी अलिप्तता,*
*...... त्या उन्नत आरोळ्या ऐकून*
*पेटली सर्वांगात चीड.*
*करवेना दमन अंतःकरणातून*
*उठलेल्या वेदनांचे भावनांचे*
*रामदासाने सांगितलेल्या सज्जनपणाचे*
*उठत राहीले वादळ संत, शुरांनी*
*दाखवलेल्या प्रखर मराठीपणाचे.*
*काय मित्रांनो, तुम्ही*
*गाथेतील तुक्याच्या अभंगहाका आहेत*
*ऐकल्या*
*अन् चोख्याच्या शिव्या आहेत देखल्या.*
*किती जळजळते दुःख आहे*
*ज्याचे अंतरी आहे प्रेम भरपूर*
*त्याचे शब्द करतात नर्तन गर्जन बिजलीचे*
*रडतात रडे उरकट येचांचे*
*देतात हुंदके आंबाळातील उभाळ्याचे*
*म्हणून मी गातो ती अशी झाली...*
*संकटाला शिव्या देऊ लागली*
*वादळ पिऊन वादळाला जन्म देऊ लागली*
*रुसो, मायकोवस्कीची, गार्गी चेकोव्हची*
*मराठीच्या त्या शूर शाहिरांची...*

• • •

## नवा मानव हा

*नवा मानव हा ! नवा मानव हा ! नवीन याची काया-*
*नवेच याचे मन नवे नयन !*
*क्षितिजाच्या आत, आहे नजर रोवून*
*निर्दय निसर्गाशी बलवंत कर झुंजवून*
*आणि दुजा कर अमृतात बुडवून*
*भागीरथ प्रयत्नाने मरण मारुन*
*उभारीत आहे श्रमाने नवा सुंदर स्वर्ग*
*प्रेषीत न होता श्रमिक राहून !*
*-नवा मानव हा !*
*सांगत नाही हा, मी जन्मलोय*
*आकाशाच्या कानातून अन् आलोय*
*स्वर्गाच्या बापाची सनद घेऊन*
*उलट हा सांगतो गर्जून*
*की मातीच्या समृद्ध उदरांतून*
*नभाच्या सातलाख पडद्यांतील स्वर्ग*
*दावील मी घामातून निर्मून !*
*- नवा मानव हा !*
*तारकांच्या असंख्यतेने*
*प्रचंड पोलादी संघटन करून*
*अन् बलाने गर्जना करुन*
*की जिच्या वेगाने, आघाताने*
*आकाशाची सारी दारे, उघडत आहे खडखडून*
*आणि भयाने इंद्राचे सिंहासन*
*खडूसारखे जात आहे तुटून फुटून*
*दारिद्रयाने भरणाऱ्याची नोंद करणारे*
*चोपडे जात आहे आहे उडून !*

-नवा मानव हा !
आणि खालती करत आहे रण
एक होऊन, मुक्त प्रकाशित कराया केवळ
जगाचा कणन् कण
मुक्त होऊन रुसमध्ये, चीनमध्ये
पूर्व युरोपात, आशियात
जुने थर्मामीटर, बलबुद्धी मोजण्याचे
कर्तुत्वाने टाकून फोडून
अनंताच्या आतील गोलावर
दाखवित आहे आपली छाया पाडून !
-नवा मानव हा !
कोषांतील किड्यापरी
जो होता सुस्त तो झोपून
शासनकर्त्यांच्या पिसाळलेल्या असूडाने
पडलेल्या कातडीच्या चिंध्या
कर्मवादाने, निराशेने घेत होता लिंपून
भाकडकथांतील गरिबाच्या वालीवर
आंधळी भाविकता, वेडी श्रद्धा ठेवून
जगत होता केवळ
स्वर्गसुखाचे नाव जपून
करत होता संसार
मरणाच्या मद्याने झिंगून
परंतु आज-
अज्ञानाच्या कोषाचे बंद तोडून
मरणाच्या मद्याची बाटली फोडून, चूर्ण करुन
लहरी वसुंधरेला आहे प्रीतराणी करुन !
-नवा मानव हा !

होता दुःखी जेधवा
रक्त शोषित होत्या गुलामगिरीच्या जळवा
त्यावेळी यावे, आपल्या अमित कल्पनाशक्तीने
दुःखे विसरण्याकरता
वणे जीवनावरली बांधण्याकरता
केला होता स्वर्ग
दुःखित नि पीडित नागवलेले नि शापलेले
जीवन विसरण्याकरता
की ज्यात अमृत आणि चिरसुख मिळते
संपन्न जीवन जगता येते
अमर प्रेम करता येते
पण स्वर्गाकडे बघता बघता
मान मुरगळून पडत होती, नजर झडत होती
आणि चित्रगुप्ताची पृष्ठे, उलटत होती
परंतु आज प्रत्यक्ष
रोवून आहे पाय वाऱ्यावर
अन् करत आहे सुखेनैवशाय्या !
- नवा मानव हा !
सोव्हीयेत रुसमधील सहाऱ्यांत
गव्हाच्या पुष्ट पिवळ्या लोंब्या
उठत आहेत खिदळून
आणि विनयाने, नव्या सभ्यतेने
पर्वत देत आहेत जागा मोकळी करुन
खोल खोल भूमीत रुतलेला पाय उचलून
सदा रागवलेल्या, कुत्र्यासारख्या पिसाळलेल्या
नद्या छायेप्रमाणे
जात आहेत याच्या मागून
लाटांचे पैजंण छन् छन् झन एकारुन !

-नवा मानव हा !

आणि
वांझ रुक्ष धरणीवर
प्रसन्न हिरवे संगीत घुमवून
दिशांत नवे राग मुरवून
नव्या मानवाच्या नव्या बलाचा घोष करुन
अन् देत आहेत त्या स्वसर्वस्वाचे पाणी
नव्या मानवाच्या चरणी ओतून !

-नवा मानव हा !

युगायुगापासून
स्वशक्तीचे स्वामित्व मिरवित
माणसाला आणि त्याच्या जगताला
जंतू लेखीत
दर्पाने गुरुगर्जना ठोकीत
सागर आला पृथ्वी आक्रमित
त्या उन्मत सागराच्या
कपड्याच्या घड्या घालतात
गिरणीत फोल्डींग खात्यात
त्याप्रमाणे घड्या घालून
आणि घेत आहेत त्याला राबवून !

-नवा मानव हा !

जनतेच्या सुखाकरता
विश्वबंधुत्वाकरता
अपार उत्साहाने हासत गाणे गात
नवनिर्मिती करत असलेल्या मानवाकडे
रवी आश्चर्याने चकीत होऊन, पहातो सारखा
क्षितीजाच्या राज्यावर उभे राहून
पण हाकावर हाका, चंद्र तारका मारतात आतून

कारण चंद्र तारकांच्या मनात
उत्सुकता येते उकळून
मग नाईलाजाने सूर्य जातो
दार उघडून आणि नंतर
तीव्र जिज्ञासेने तर्र होवून
चंद्रतारकांचा मेळा येतो
खडाखडा दारे उघडून
हसतात सारखे प्रसन्न होवून
नव्या मानवाचा विजय देखून !
-नवा मानव हा !
थांबेल गर्जना
गळा जर दाबला घनांचा
बांधून टाकली तर
थांबेल नाच बिजलीचा
लावले दार जर प्राचीचे
उदय होणार नाही सूर्याचा
पण विश्वबंधुत्वास्तव उगारलेली
नव्या मानवांची वखार
मागे नच येणार
कारण वर्तमान, भूत, भविष्य
आकाशातील तारे, झाडाचे पानन् पान
मातीचा कण न् कण सांगत आहे गर्जून
विजय याचा अन् हा-
विश्वाचा नियंता
-नवा मानव हा !

• • •

# मला प्रलय केले आहे

*तू जिथे दैन्य, दास्य चिरंजीव करुन ठेवलेस*
*तिथेच माझा जन्म झाला  आहे*
*तुला वाटले असेल मीही*
*माझ्या पूर्वजाप्रमाणे सडून किडून मरेन*
*अथवा सोबत्याप्रमाणे वहात जाईन*
*पण झाले वेगळेच*
*ज्याने दुःख पाहिलेले असते*
*त्याला मार्गदाता म्हणतात.*
*मी दुःख पाहिले आहे*
*म्हणून मी हात उंचावून तुला सांगतो*
*तुझे सर्व चिरंजीव मरणार आहेत.*
*प्रलय आले आहेत*
*मला प्रलय केले आहे !*

• • •



वेदाआधी तू होतास
वेदाच्या परमेश्वराआधी तू होतास,
पंच महाभूतांचे पाहून
विराट, विक्राळ रूप
तू व्यथित, व्याकूळ होत होतास,
आणि हात उभारुन तू याचना करीत होतास,
त्या याचना म्हणजे 'ऋचा'
सर्व ईश्वरांचे जन्मोत्सव,
तूच साजरे केलेस,
सर्व प्रेषितांचे बारसेही
तूच आनंदाने साजरे केलेस
हे माणसा,
तूच सूर्याला सूर्य म्हटलेस
आणि सूर्य, सूर्य झाला
तूच चंद्राला चंद्र म्हटलेस
आणि चंद्र, चंद्र झाला
अवघ्या विश्वाचे नामकरण
तू केलेस
अन् प्रत्येकाने मान्य केले
हे प्रतिभावान माणसा,
तूच आहेस सर्व क
तुझ्यामुळेच सजीव
झाली ही मही.

Library IIAS, Shimla
00124279